**<u>नियमीत दिवाणी दावा क्रं. २२/२०२२ मधील नि. ३७ खाली आदेश</u>**

प्रस्तुत दावा वादीने अग्रहक्काने खरेदी मिळणेसाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे.

०२. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे 'दाव्यामध्ये व मनाई अर्जात दुरुस्ती करण्यास परवानगी द्यावी' यासाठी दाखल केला आहे. वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे सख्खे भाऊ आहेत. सदर कामी प्रतिवादी यांनी नि.क्रं.१० वर त्यांची कैफियत व नि.क्रं. ११ ला म्हणणे दाखल केले आहे. सदर कैफियतीचे अवलोकन करता प्रतिवादी यांनी दावा मिळकत १ भू.ग.क्रं.१२५–अ ही मिळकत दि. २१.०१.२०२२ रोजी नोंदणीकृत दस्त क्रं. २०७/२०२२ ने सदर मिळकत अमर बंडोपंत पाटील व सविता तानाजी केसरकर यांना तबदिल केलेचे कथन केले आहे.

०३. त्यामुळे वादींना सदरचा दावा दुरुस्तीचा अर्ज व खरेदी घेणार यांना याकामी प्रतिवादी म्हणून दाव्यामध्ये पक्षकार करणेकामी सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. नि.क्रं.१८ वरील आदेशा प्रमाणे प्रतिवादी क्रं. २ व ३ म्हणून दावामध्ये व मनाई अर्जामध्ये समाविष्ठ केले आहे.

०४. प्रतिवादींचे कथनानुसार वादीने दि. १३.०३.२००२ रोजी दुय्यम निंबध पन्हाळा यांचे कार्यालयात नोंदणीकृत दस्त क्रं. २०७/२०२२ ची नक्कल काढल्यानंतर वादीना दावा मिळकत तबदिल झालेचे प्रथमदर्शनी समजुन आले. प्रतिवादींचे सदरचे कृत्य हे पूर्णपणे बेकायदेशीर व अनाधिकराचे असलेने वादीना दाव्यात व मनाई अर्जात खालील प्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

०५. <u>वादी यांनी दाव्यात व मनाई अर्जात मागितलेल्या दुरुस्त्या.</u>

दावा टायटल क्लॉजमध्ये ''दावा हक्कज्ञापनाकरीता'' म्हणून व त्याची दावा कोर्ट फी व कोर्टाचे ज्युरिसडिक्शन'' १,१४,५००/– अशी दुरुस्ती करणेस परवानगी. तसेच दावा व मनाई अर्जात परिच्छेद ६–अ, दावा अर्जी कलम ७, दावा अर्जी कलम ८, दावा अर्जी कलम १३, दावा अर्जी कलम १३ मध्ये १–क, मनाई अर्जी कलम १० मध्ये कलम ब–१ म्हणून, अशा वेगवेगळया दुरुस्त्या वादी यांनी सुचविल्या आहेत.

०६. सदरची दुरुस्ती ही औपचारिक स्वरुपाची असून सदरची दुरुस्ती केलेस दावेमध्ये कोणताही बदल होणार नाही तसेच दावेशी विसंगत अशी केस निर्माण होणार नाही. सदरची दुरुस्ती केलेस दावेस मदतच होणार आहे. याउलट तशी दुरुस्ती न झालेस वादीचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरची दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादी

यांनी केली आहे.

०७. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सदर अर्जाचे पाठीमागे दाखल केले आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे लेखी म्हणण्यात असे कथन केले आहे की, सदर अर्जातील सर्व कथने ही चुकीची असून ती प्रतिवादी यांना मान्य नाहीत. त्यामुळे वादी यांचा सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०८. दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे संपुर्ण 'रेकार्ड' पहाता असे आढळते की, सदरचा दावा दि. २२–०२–२०२२ रोजी दाखल केला आहे. प्रतिवादी यांची कैफियत नि.क्रं.१० वर दाखल आहे. सध्या दावा मनाई अर्जाच्या युक्तीवादावार व दुरुस्त प्रत देणेवर प्रलंबित आहे. वरीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे.

०९. सदरचा दावा हा अग्रहक्काने खरेदीकरुन मिळणेसाठी व मनाईचा असल्याने वादी यांनी ज्या वेगवेगळया दुरुस्त्या करुन मागितल्या आहेत. त्यामुळे दाव्यातील इतर मजकूर तसाच अबाधीत आहे. तशी दुरुस्ती न करु दिल्यास दावा मिळकतीचे वादीच्या मते असणारे वर्णन व अनुषंगीक पुरावा देणे अडचणीचे होणार आहे व त्यामुळे दाव्याचा निर्णय होण्यास अडचण निर्माण होणार आहे. परंतु सदरची दुरस्तीची परवानगी दिल्यास या प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रतिवादी याचे बचावास कोणतीही हानी पोहचणार नाही. त्या कारणाने दाव्याचे

स्वरुप पहाता न्यायालयास योग्य त्या निष्कर्षापर्यंत पोहचण्यासाठी तसेच सर्व पक्षकारांचे हक्क ठरविण्यासाठी सदरची दुरुस्ती मंजूर करणे आवश्यक आहे. तरी न्यायाच्या दृष्टीने हा अर्ज वादीवर रक्कम रु. २००/– खर्च बसवून मंजूर करीत आहे.

**१०.** अंतिमरित्या मी खालील प्रमाणे आदेश करते.

**आदेश.**

१. सदरचा अर्ज वादीने प्रतिवादी यांना रुपये २००/– कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात आला.

२. वादींनी जी दाव्यात व मनाई अर्जात दुरुस्ती करुन मागितली आहे त्या दुरुस्त्या करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

Neha K.Nagargoje

Digitally signed by Neha K.Nagargoje
Date: 2022.09.20 17:53:45 +0530

दि.२०.०९.२०२२.
कळे–खेरीवडे.

(एन.के.नागरगोजे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कळे–खेरीवडे.